



सर्वमंगल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥

संस्थापक डी. एन. शिर्के यांचे सर्वाधिक लोकप्रिय प्रकाशन ॥ श्री गुरुदेव दत्तात्रेय प्रसन्न ॥ मुंबई, पुणे व कोंकण आवृत्ती

शास्त्रशुद्ध संपूर्ण वार्षिक पंचांग

# श्री महालक्ष्मी®

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि., कोल्हापूर

Mahalaxmi.Org.in

## ७ जुलै २०२५

आषाढ–श्रावण श्री शालिवाहन शके १९४७ | विक्रम संवत् २०८१ शिवशक ३५२ | सौर वर्षा ऋतू दक्षिणायन

### राहू काल

| | |
|---|---|
| रविवार | सायं.४.३० ते ६.०० |
| सोमवार | सकाळी ७.३० ते ९.०० |
| मंगळवार | दुपारी ३.०० ते ४.३० |
| बुधवार | दुपारी १२.०० ते १.३० |
| गुरुवार | दुपारी १.३० ते ३.०० |
| शुक्रवार | सकाळी १०.३० ते १२.०० |
| शनिवार | सकाळी ९.०० ते १०.३० |

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवि | (राहू काल) | आषाढ शु.११ विशाखा<br>**६**<br><br>देवशयनी आषाढी एकादशी<br>पंढरपूर यात्रा, चातुर्मास्यारंभ<br>गुरू दर्शन, मोहरम(ताजिया) ताबूत विसर्जन मु.१० | आषाढ कृ.३ श्रवण<br>**१३**<br>वीर शिवा काशीद पुण्यदिन<br>जया–पार्वती व्रत समाप्ती<br>पंचक सायं.६.५३ नं. मु.१७ | आषाढ कृ.१० कृत्तिका<br>**२०**<br>मु.२४ | श्रावण शु.३ मघा<br>**२७**<br>मधुस्त्रवा तृतीया<br>आदित्य पूजन सफर मु.१ |
| सोम | | आषाढ शु.१२ अनुराधा<br>**७**<br>वामन पूजन, शाकगोपद्मव्रतारंभ<br>जंगली महाराज उत्सव प्रारंभ<br>कोकमठाण ता.कोपरगाव मु.११ | आषाढ कृ.४ धनिष्ठा<br>**१४**<br><br>संकष्ट चतुर्थी<br>चंद्रोदय रात्री १०.०३<br>समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर जन्मदिन मु.१८ | आषाढ कृ.११ रोहिणी<br>**२१**<br>कामिका एकादशी<br>आळंदी व निर्मळ यात्रा<br>गोदड महाराज रथयात्रा कर्जत जि.नगर, विठ्ठल मंदिर उत्सव प्रा.ताहराबाद जि.नगर मु.२५ | श्रावण शु.४ पू.फाल्गुनी (१ ला सोम)<br>**२८**<br>नागचतुर्थी उपवास<br>शिवपूजन, शिवामूठ तांदूळ<br>विनायक चतुर्थी, दुर्वागणपती व्रत<br>श्री रत्नेश्वर उत्सव धामणसे ता.जि.रत्नागिरी मु.२ |
| मंगळ | आषाढ शु.६ पूर्वा फाल्गुनी<br>**१**<br>महाराष्ट्र कृषी दिन<br>चार्टर्ड अकौंटंटस् डे<br>संत गुलाबबाबा पालखी प्रस्थान मौजे रेडा ता.इंदापूर<br>डॉक्टर्स डे मोहरम मु.५ | आषाढ शु.१३ ज्येष्ठा<br>**८**<br>भौमप्रदोष<br>जया–पार्वती व्रतारंभ<br>संत मामा दांडेकर पु.ति.पुणे<br>श्री कल्याणस्वामी पुण्यतिथी डोमगाव ता.परांडा मु.१२ | आषाढ कृ.५ शततारका/ पूर्वा भाद्रपदा<br>**१५**<br>सरखेल कान्होजी आंग्रे पुण्यतिथी मु.१९ | आषाढ कृ.१२/१३ मृग<br>**२२**<br><br>संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा<br>संत कन्नन महाराज पुण्यतिथी<br>नित्यानंद महा.पु.ति.गणेशपुरी ता.वसई, भौमप्रदोष मु.२६ | श्रावण शु.५ उत्तरा फाल्गुनी<br>**२९**<br>नागपंचमी<br>मंगलागौरी पूजन<br>ऋक शुक्ल यजुः श्रावणी<br>नाग यात्रा ललगुण ता.खटाव, सांगली व बत्तीसशिराळा<br>जागतिक व्याघ्र दिन मु.३ |
| बुध | आषाढ शु.७ उत्तरा फाल्गुनी<br>**२**<br>विवस्वत सप्तमी, बुधाष्टमी मु.६ | आषाढ शु.१४ मूळ<br>**९**<br>महाराष्ट्रीय बेंदूर<br>पौर्णिमा उ.रात्री १.३६ नंतर<br>नंदी यात्रा काले ता.कराड व शिरटे ता.वाळवा मु.१३ | आषाढ कृ.६ उत्तरा भाद्रपदा<br>**१६**<br>कर्क संक्रांती सायं.५.३१<br>पुण्यकाल सूर्योदय ते सायं.५.३१<br>मरिमाता यात्रा कावळवाडी ता. करमाळा, बालमुकुंद बालावधूत पुण्यतिथी कोल्हापूर मु.२० | आषाढ कृ.१४ आर्द्रा<br>**२३**<br>शिवरात्री<br>लोकमान्य टिळक जयंती<br>संत सावता माळी पुण्यतिथी<br>अमावास्या उ.रात्री २.२८ नं.<br>स्वयंज्योति मुळे महाराज पुण्यतिथी सातारा मु.२७ | श्रावण शु.६ हस्त<br>**३०**<br>कल्की जयंती<br>सूपोदन वर्णषष्ठी, श्रीयाळ षष्ठी<br>दादा महाराज केळकर पु.ति. सांगली, श्री एकनाथ महाराज बहुलेकर पु.ति.बहुले ता.पाटण<br>बुध पूजन मु.४ |
| गुरु | आषाढ शु.८ हस्त<br>**३**<br>दुर्गाष्टमी<br>श्री सावळारामबुवा शेजवळ पुण्यतिथी जुन्नर जि.पुणे<br>*अष्टान्हिक पर्वारंभ(जैन)* मु.७ | आषाढ शु.१५ पूर्वाषाढा<br>**१०**<br><br>गुरुपौर्णिमा उ.रा.२.०६ प.<br>कुलधर्म, व्यासपूजा, गुरुपौर्णिमा उत्सव शिर्डी व शेगांव<br>पारनेरकर महाराज जयंती<br>विठ्ठल नवरात्र समाप्ती मु.१४ | आषाढ कृ.७ रेवती<br>**१७**<br>कालाष्टमी<br>पंचक उ.रात्री ३.३८ पर्यंत<br>करिदिन मु.२१ | आषाढ कृ.३० पुनर्वसु<br>**२४**<br>दर्श अमावास्या उत्तर रात्री १२.४० पर्यंत, दीपपूजन<br>गुरुपुष्यामृत सायं.४.४३ ते उ.रात्री ६.१५, मरगुबाईदेवी यात्रा बेवनूर ता.जत मु.२८ | श्रावण शु.७ चित्रा<br>**३१**<br>सीतला सप्तमी<br>भ.पार्श्वनाथ निर्वाण दिन<br>गोस्वामी तुलसीदास जयंती<br>छ.राजाराम महाराज जयंती करवीर, नाना शंकरशेट पु.दि.<br>बृहस्पती पूजन सफर मु.५ |
| शुक्र | आषाढ शु.९ चित्रा<br>**४**<br>सरखेल कान्होजी आंग्रे पुण्यदिन मु.८ | आषाढ कृ.१ उत्तराषाढा<br>**११**<br>वीर बाजीप्रभू देशपांडे पु.ति.<br>जागतिक लोकसंख्या दिन<br>पारशी अस्पंदार्मद मासारंभ<br>ह.स.मकदूम उरूस करकंब ता.पंढरपूर मु.१५ | आषाढ कृ.८ अश्विनी<br>**१८**<br>लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुण्यदिन<br>ह.माँसाहेबी उरूस तेलगाव (मं.) ता.द.सोलापूर मु.२२ | श्रावण शु.१ पुष्य<br>**२५**<br>श्रावण मासारंभ<br>महालक्ष्मी स्थापन व पूजन<br>द्वार यात्रा चिंचवड, नक्तव्रतारंभ<br>जरा जिवंतिका पूजन मु.२९ | **गोव्यातील उत्सव**<br>दि.६ सांखळी पांडुरंग जत्रा, श्री महालक्ष्मी संस्थान उत्सव प्रारंभ सालशेत–कोलवा<br>दि.२२ श्री महालक्ष्मी संस्थान जत्रा सालशेत–कोलवा<br>दि.३० वास्को सप्ताह |
| शनि | आषाढ शु.१० स्वाती<br>**५**<br>जागतिक सहकार दिन<br>श्री जगन्नाथ पुनर्यात्रा पुरी<br>पुनर्वस्यर्कः उ.रात्री ५.४७ वा.–घोडा, विठ्ठल नवरात्रारंभ<br>खत्तलरात्र मोहरम मु.९ | आषाढ कृ.२ उत्तराषाढा (२ रा शनि)<br>**१२**<br>अशून्यशयन व्रत मु.१६ | आषाढ कृ.९ भरणी<br>**१९**<br>पुष्येर्कः उ.रात्री ५.२१, वा.मोर मु.२३ | श्रावण शु.२ आश्लेषा (४ था शनि)<br>**२६**<br>अश्वत्थ मारुती पूजन<br>चंद्रदर्शन मोहरम मु.३० | Mahalaxmi.org.in |

### तिथीविषयक माहिती

दि.१ श्री यशवंतबाबा पुण्यतिथी कुरोली सिध्देश्वर ता.खटाव जि.सातारा
दि.६ श्री विठ्ठल यात्रा डाळींबबन ता.दौंड श्री विठ्ठल यात्रा नंदवाळ ता.करवीर
दि.१० मातृसुरक्षा दिन
संन्यासिनां चातुर्मास्यारंभ
*अष्टान्हिक पर्व समाप्ती(जैन)*
अंबाजी–निंबाजी देवस्थान उत्सव वडापुरी ता.इंदापूर जि.पुणे
चिदानंद गुरव महा.जयंती पिंपळे गुरव पुणे
गुरुपौर्णिमा उत्सव दत्त मंदिर बाजीरे ता.पोलादपूर जि.रायगड
नामसप्ताह हिंगणगाव ता.फलटण
मातोश्री सरुताई गुरुपौर्णिमा महोत्सव मायणी ता.खटाव जि.सातारा
दि.११ बसवेश्वर यात्रा शिरटे ता.वाळवा
दि.१६ श्री खोपकर महाराज पुण्यतिथी धबधबेवाडी ता.पन्हाळा जि.कोल्हापूर
दि.२१ दुर्गानंद महाराज पुण्यतिथी तासगाव
दि.२२ सिंहायन सायंकाळी ६.५९
श्री मंगाईदेवी यात्रा वडगाव बेळगाव
दि.२३ भारतीय श्रावण मासारंभ
दि.२८ मुद्गलभारती म.पु.ति.अंबाडा ता.मोर्शी
तपोनिधी नारायण महा.पु.ति.देहू जि.पुणे
काशिविश्वनाथ यात्रा ढोरजा ता.श्रीगोंदा
दि.२९ मळसूर यात्रा मळसूर ता.पातूर
चौंडेश्वरीदेवी यात्रा सोनगे ता.कागल
नागपंचमी यात्रा ढोलगरवाडी ता.चंदगड व कसबा बावडा जि.कोल्हापूर
ज्योतिर्लिंग व नाग यात्रा वाघापूर ता.भुदरगड
दि.३० ऋक हिरण्यकेशी श्रावणी
श्री नागराज यात्रा कासेगाव ता.वाळवा

### ✻ पर्जन्य अंदाज ✻

**पुनर्वसु (तरणा पाऊस):** शनिवार दि.५ जुलै रोजी उ.रात्री ५ वाजून ४७ मिनिटांनी सूर्य पुनर्वसु नक्षत्रात प्रवेश करणार असून त्याचे वाहन **घोडा** आहे. ग्रहयोगांचा विचार करता या नक्षत्राचा मध्यम प्रमाणात सर्वत्र पाऊस होण्याची चिन्हे आहेत. दि.९, १०, दि.११ ते १४ आणि दि.१८ जुलै रोजी पाऊस अपेक्षित आहे.

**पुष्य (म्हातारा पाऊस):** शनिवार दि.१९ जुलै रोजी उ.रात्री ५ वाजून २१ मिनिटांनी सूर्य पुष्य नक्षत्रात प्रवेश करणार असून त्याचे वाहन **मोर** आहे. अनेक ठिकाणी उत्तम पाऊस होईल. तर काही भागात पूर येण्याची शक्यता आहे. दि.२१, २४, २७, २८ जुलै ते दि.१ ऑगस्ट रोजी पाऊस अपेक्षित आहे.

### दि.२४ जुलै व दि.२१ ऑगस्टचा गुरुपुष्यामृत योग खुलासा

दिवस शुभ किंवा अशुभ ठरवण्यासाठीचे नियम गुरुपुष्य योगापेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे ते दोन्ही एकाच दिवशी येऊ शकतात. त्यामुळे गुरुपुष्य योगाच्या दिवशी अशुभ दिवस येत असल्यास, केवळ गुरुपुष्य योगावर चालणारी कार्ये वगळता बाकी कार्यांसाठी तो दिवस अशुभ मानावा.

**शुभ दिवस**–दि.१,२ मध्यम, दि.३,४ शुभ, दि.५ रात्री ७.५० पर्यंत शुभ, दि.७,९ शुभ, दि.१० दुपारी १.५५ ते रात्री ९.३७ प.शुभ, दि.११ मध्यम, दि.१२ शुभ दिवस, दि.१३ दु.१.२७ प.शुभ, दि.१४,१५,१६ शुभ दिवस

दि.१८,१९,२१,२५,२७ शुभ दिवस, दि.२८ मध्यम दिवस, दि.२९,३०,३१ शुभ दिवस

**त्याज्य दिवस**
दि.८,१७,२०,२२,२३,२४,२६

वास्तू मुहूर्त–दि.३०,३१
भूमिपूजन मुहूर्त–दि.३०

या महिन्यात उपनयन व विवाह मुहूर्त नाहीत.



**साखरपुडा मुहूर्त**–दि.१,२,३,४,५,७, दि.९,१२,१३,१८,२१,२७,३०,३१
**जावळ मुहूर्त**–दि.२,३,४,७,९,१३,१४, दि.१८,२१,२७,२८,३०,३१



दि.६ देवशयनी आषाढी एकादशी

Mahalaxmi.org.in



सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२५३०३२५

## सन २०२५ मधील मंदगती ग्रहांचे राशिपालट

### राहू-केतू राशिप्रवेश

राहू(व) दि.२९ मे २०२५ रोजी रात्री १०.२६ वाजता कुंभ राशीत प्रवेश करील, तर केतू(व) दि.२९ मे २०२५ रोजी रात्री १०.२६ वाजता सिंह राशीत प्रवेश करील.

राहू-केतू राशिप्रवेशाच्या वेळेप्रमाणे सामान्यपणे खालीलप्रमाणे फले देतील. राहू-केतू हे पातबिंदू आहेत व ते दर दीड वर्षांनी मागील राशीत असतात व तेथे दीड वर्षे असतात. सामान्यपणे त्यांचा इतर ग्रहांचा संबंध नसेल तर ते ज्या राशीत असतात त्या राशिस्वामीप्रमाणे फले देतात. तसेच त्यांचेबरोबर एखादा ग्रह असेल तर तो ग्रह पुढील राशीत जाईपर्यंत त्या ग्रहाप्रमाणेही फले देतात. यामुळे राहू-केतूंच्या फलात जास्त आक्रमकपणा किंवा गाफीलपणा येत असतो.

केंद्र त्रिकोणात राहू-केतू असता त्रिकोणेश किंवा कोणेशांच्या संबंधाने ते राजयोगकारक व शुभ फले देत असतात, तशी स्थानफलेही देतात.

राशिप्रवेशाच्या वेळेप्रमाणे राहू-केतूची फले खालीलप्रमाणे राहतील.

| पाद | फल | राहू(कुंभेत),केतू(सिंहेत) |
|---|---|---|
| | | (जन्मराशी) |
| सुवर्ण | चिंता | मिथुन, सिंह, मकर |
| रौप्य | शुभ | वृषभ, तूळ, कुंभ |
| ताम्र | श्रीप्राप्ती | मेष, कन्या, धनू |
| लोह | कष्ट | कर्क, वृश्चिक, मीन |

राहू-केतू एकाचवेळी राशिपालट करत असल्यामुळे दोघांचे सर्वसाधारण फल हे एकच राहील. राहू-केतूंचे राशिपरत्वे स्थानफले खालीलप्रमाणे राहतील.

| राहू राशिप्रवेश | स्थानफले |
|---|---|
| कुंभ १ ला | हानी |
| मीन १२ वा | शोक |
| मेष ११ वा | सुख |
| वृषभ १० वा | वैर |
| मिथुन ९ वा | दुरित |
| कर्क ८ वा | शारीरिक पीडा |
| सिंह ७ वा | कलह |
| कन्या ६ वा | श्री |
| तूळ ५ वा | शोक |
| वृश्चिक ४ था | वैर |
| धनू ३ रा | धनलाभ |
| मकर २ रा | धननाश |

| केतू राशिप्रवेश | स्थानफले |
|---|---|
| सिंह १ ला | रोग |
| कन्या १२ वा | शत्रुभय |
| तूळ ११ वा | कीर्ति |
| वृश्चिक १० वा | शोक |
| धनू ९ वा | पाप |
| मकर ८ वा | रोग |
| कुंभ ७ वा | गमन |
| मीन ६ वा | धन |
| मेष ५ वा | सुख |
| वृषभ ४ था | भय |
| मिथुन ३ रा | सुख |
| कर्क २ रा | वैर |

### शनि राशिप्रवेश

शनिपालट दि.२९ मार्च २०२५ रोजी रात्री ९.४२ वाजता मीन राशीत प्रवेश करील. फाल्गुन कृष्ण ३० शनिवार रात्री ९.४२ वाजता (चैत्र शुक्ल १) शनि मीन राशीत प्रवेश करील. शनि एका राशीत सुमारे अडीच वर्ष असतो. शनि राशिप्रवेशाच्या वेळेप्रमाणे खालीलप्रमाणे फले देईल.

| पाद | फल | जन्मराशी |
|---|---|---|
| सुवर्ण | चिंता | वृषभ, तूळ, मीन |
| रौप्य | शुभ | कर्क, वृश्चिक, कुंभ |
| ताम्र | श्रीप्राप्ती | मिथुन, कन्या, मकर |
| लोह | कष्ट | मेष, सिंह, धनू |

मीन राशीत शनि असताना साडेसातीतील राशी- कुंभ, मीन, मेष. साडेसातीतील राशींना प्रत्येक कार्यात विलंब, अडचणी, त्रास अनुभवास येईल. धनू राशीस (४ था शनि), सिंह राशीस (८ वा शनि) यांनाही साडेसातीप्रमाणे अनुभव येईल.

**मीन राशीत शनि असताना राशिनिहाय शनिची अन्य फले खालीलप्रमाणे-**

**मेष-** अवास्तव कौटुंबिक खर्च व समस्या जाणवतील. मोठ्या गुंतवणुकीचे अंदाज चुकू शकतील. नेत्रविकार जाणवतील.

**वृषभ-** कायमस्वरूपी नोकरी मिळू शकेल. वृध्दांनी प्रकृतीस जपावे. आर्थिक लाभ चांगले होतील. प्रलोभने टाळा.

**मिथुन-** भाग्यकारक अनुभव येतील. आई-वडिलांना त्रास संभवतो. सामाजिक कामातून लाभ होईल. विवाह जुळेल.

**कर्क-** कलह टाळा. कामासाठी प्रवास घडेल. भावंडांना व वडिलांना त्रास संभवतो. आर्थिक प्राप्ती चांगली राहील.

**सिंह-** विपरीत घटनेतून लाभ संभवतो. धंदा-व्यवसायात अडचणी, आर्थिक हानी संभवते. संततीला त्रास संभवतो.

**कन्या-** विवाह जुळेल. स्वतःच्या, आईच्या, पत्नीच्या प्रकृतीस त्रास संभवतो. भावनिक वादळात अडकाल.

**तूळ-** आर्थिक लाभ होतील. संघर्षातून यश मिळेल. आरोग्यप्राप्ती होईल. विषारी जनावरांची भीती राहील. क्रोध आवरा.

**वृश्चिक-** जवळच्या व्यक्तींना दुखवू नका.धार्मिक कृत्ये कराल. भावनिक संघर्ष टाळा. धननाश होईल. अनेकांशी कलह होईल. लेखनकार्य उत्तमरित्या कराल.

**धनू-** कुटुंबातील व नातेवाइकांच्या समस्यांकडे लक्ष द्यावे लागेल. मानसिक समतोल राखा. विवाह जुळल्यास सुंदर स्थळ मिळेल. भावनावेग आवरा.

**मकर-** नोकरीत लाभ होईल. वरचा दर्जा मिळेल. नोकर-चाकरांचे सौख्य लाभेल. कार्यसिध्दी होईल.

**कुंभ-** कोणालाही जामीन राहू नका. गृहसौख्यात अडचणी येतील. कुटुंबात अनाकलनीय समस्या राहतील.

**मीन-** आर्थिक प्राप्ती चांगली राहील. स्वभाव खर्चिक बनेल. वडील, पत्नी तसेच भावंडांना त्रास संभवतो. वादविवाद टाळा.

### उपासना

समस्यांचे निवारण करण्यासाठी मारुतीची उपासना करावी तसेच हनुमान चालिसा व मारुती स्तोत्र वाचावे.

### गुरु राशिप्रवेश

**१.** गुरु मिथुन राशीत दि.१४ मे २०२५ रोजी रात्री १०.३५ वाजता प्रवेश करील.

| पाद | फल | गुरुपालट-१ (मिथुनेत) दि.१४ मे २०२५ |
|---|---|---|
| | | (जन्मराशी) |
| सुवर्ण | चिंता | मिथुन,वृश्चिक,मकर |
| रौप्य | शुभ | कर्क, तूळ, मीन |
| ताम्र | श्रीप्राप्ती | वृषभ, कन्या, कुंभ |
| लोह | कष्ट | मेष, सिंह, धनू |

**२.** गुरु कर्क राशीत दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ७.२५ वा. प्रवेश करील.

| पाद | फल | गुरुपालट-२ (कर्केत) दि.१८ ऑक्टो. २०२५ |
|---|---|---|
| | | (जन्मराशी) |
| सुवर्ण | चिंता | सिंह, तूळ, मीन |
| रौप्य | शुभ | मेष, कर्क, धनू |
| ताम्र | श्रीप्राप्ती | मिथुन, वृश्चिक, कुंभ |
| लोह | कष्ट | वृषभ, कन्या, मकर |

**३.** गुरु मिथुन राशीत दि.५ डिसेंबर २०२५ रोजी सायं.५.३० वाजता प्रवेश करील.

| पाद | फल | गुरुपालट-३ (मिथुनेत) दि.५ डिसेंबर २०२५ |
|---|---|---|
| | | (जन्मराशी) |
| सुवर्ण | चिंता | वृषभ, कर्क, धनू |
| रौप्य | शुभ | मेष, कन्या, मकर |
| ताम्र | श्रीप्राप्ती | सिंह, वृश्चिक, मीन |
| लोह | कष्ट | मिथुन, तूळ, कुंभ |

मिथुन राशीतील गोचरीचा गुरु जन्मराशी वृषभेस २ रा, कुंभेस ५ वा, धनूस ७ वा, तूळेस ९ वा, मेषेस १ ला उत्तम असून शिक्षण, विवाह, धंदा-व्यवसायातील आर्थिक लाभ, समाजाभिमुखता, कर्जफेड, परदेशगमन, तीर्थयात्रा, मंगलकार्ये इ.साठी अनुकूल राहील. संततीसुख मिळेल.

मिथुन राशीतील गोचरीचा गुरु मिथुन, सिंह राशीस महत्त्वाकांक्षा, परदेशगमन इ.साठी अनुकूल राहील, पण स्वजनांपासून दूर जाल. विवाह जुळू शकेल.

मिथुन राशीतील गुरु कर्केस १२ वा, मीनेस ४ था, वृश्चिकेस ८ वा अनिष्ट फलदायी राहील. मीन राशीची निर्णायक कामे होतील. कर्केस परदेशगमनाची संधी देईल. वृश्चिकेस प्रकृतीची काळजी लावेल. या तीन राशींची आध्यात्मिकता वाढेल.

मकर राशीस हा ६ वा, तर कन्या राशीस १० वा मध्यम फलदायी राहील. नातेवाइकांशी वाद टाळावेत, तर कन्या राशीतील व्यक्तींनी गुणवत्तेकडे अधिक लक्ष द्यावे.

सन २०२५ मध्ये गुरु दि.१८ ऑक्टोबर ते दि.५ डिसेंबरपर्यंत कर्क या स्वतःच्या उच्च राशीत असल्यामुळे प्रत्येक राशिकुंडलीत धनू व मीन रास ज्या स्थानात असेल त्या स्थानांची फले चांगली देईल.

गोचरीचा कर्केचा गुरु मेषेस ९ व १२, वृषभेस ८ व ११, मिथुनेस ७ व १०, कर्केस ६ व ९, सिंहेस ५ व ८, कन्येस ४ व ७, तूळेस ३ व ६, वृश्चिकेस २ व ५, धनूस १ व ४, मकरेस १२ व ३, कुंभेस ११ व २, मीनेस १० व स्वराशीची फले उत्तम देईल.

गुरु प्रत्येक राशीस थोडी तरी चांगली फले देत असतो. गुरु एका राशीत सुमारे १३ महिने असतो.

### हर्षल राशिप्रवेश

हर्षलपालट फाल्गुन कृष्ण पंचमी बुधवार रोजी उत्तररात्री ५.४० वाजता म्हणजे दि.१९ मार्च २०२५ रोजी सकाळी ५.४० वाजता हर्षल वृषभ राशीत प्रवेश करील. हर्षल सुमारे सात वर्षे एका राशीत राहतो. हर्षल राशिप्रवेशाच्या वेळेप्रमाणे खालीलप्रमाणे फले देईल.

| पाद | फल | जन्मराशी |
|---|---|---|
| सुवर्ण | चिंता | वृषभ, तूळ, धनू |
| रौप्य | शुभ | मिथुन, कन्या, कुंभ |
| ताम्र | श्रीप्राप्ती | मेष, सिंह, मकर |
| लोह | कष्ट | कर्क, वृश्चिक, मीन |

दि.१९ मार्च २०२५ नंतर हर्षलचे मंदगती ग्रहाशी होणारे योग व त्याची जवळजवळ सर्व राशींना काही प्रमाणात मिळणारी फले खालीलप्रमाणे राहतील.

**१.** हर्षल (वृषभ) - नेपच्यून (मीन) यांचा लाभ योग- स्वतःजवळील सुप्त शक्तींची जाणीव होईल. त्याचा सर्वांनी जरूर पाठपुरावा करावा.

**२.** हर्षल (वृषभ) - प्लुटो (मकर) यांचा त्रिकोण योग- या योगाने व्यक्ती स्वतःच्या आयुष्याचे सावकाश पण पध्दतशीरपणे प्रयत्न करते व त्याचा परिणाम आयुष्यात बदल, प्रगती, परिवर्तन होण्यामध्ये होतो.

**३.** हर्षल (वृषभ) - शनि (मीनेत दि.२९ मार्च २०२५ नंतर) यांचा लाभ योग- या योगामुळे जुन्याची किंमत समजते. व्यक्ती नविनतेकडे कोणालाही न दुखावता जात असते.

**४.** हर्षल (वृषभ) - गुरु (वृषभेत दि.१४ मे २०२५ पर्यंत) यांचा सहवास (युती) योग- हा योग प्रबळ अंतर्ज्ञान शक्तीची, निवनिर्माण शक्तीशी सांगड घालणारा योग आहे.

**५.** हर्षल (वृषभ) - गुरु (कर्केत दि.१८ ऑक्टोबर ते दि.५ डिसेंबर २०२५) यांचा लाभ योग- व्यक्ती ज्या बाबींचा पाठपुरावा करेल, ती मिळू शकेल.

**६.** हर्षल (वृषभ) - गुरु (मिथुनेत दि.१४ मे ते दि.१८ ऑक्टोबर आणि दि.५ डिसेंबर २०२५ नंतर) वरील क्र.४ व ५ प्रमाणे मिळणारी फले कमी मिळतील.

**७.** अन्य योग- शनि (मीनेत दि.२९ मार्च २०२५ नंतर) व नेपच्यून मीनेत युती योग वैफल्य येते. संवेदनशीलता वाढते. परिस्थितीशी दोन हात करून पुढे वाटचाल करा.

**८.** गुरु-नेपच्यून वर्षभरात होणारे बदलते योग आध्यात्मिकता व संवेदनशीलता वाढवतील.

- होराभूषण रघुवीर खटावकर,पुणे
मोबाईल : ९३७२४२५०३१

## संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय दि.१४ जुलै

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बारामती | ०९.५४ | रत्नागिरी | १०.०१ | मार्गाव | ०९.५६ | बेंगलोर | ०९.३८ | बिदर | ०९.४२ |
| | | | | सातारा | ०९.५८ | चिपळूण | ०९.५८ | फोंडा | ०९.५६ | बेळगाव | ०९.५७ | कारवार | ०९.५६ |
| | | | | कराड | ०९.५७ | राजापूर | ०९.५७ | पणजी | ०९.५६ | बागलकोट | ०९.४८ | हुबळी | ०९.५२ |
| मुंबई | १०.०३ | पनवेल | १०.०३ | कोल्हापूर | ०९.५७ | दापोली | १०.०२ | छ.संभाजीनगर | ०९.५५ | गोकाक | ०९.५२ | धारवाड | ०९.५२ |
| ठाणे | १०.०३ | पालघर | १०.०४ | सांगली | ०९.५३ | सावंतवाडी | ०९.५७ | अहमदनगर | ०९.५५ | निपाणी | ०९.५७ | म्हैसूर | ०९.४२ |
| कल्याण | १०.०३ | नाशिक | ०९.५९ | सोलापूर | ०९.५० | कणकवली | ०९.५७ | धाराशिव | ०९.५० | अथणी | ०९.५३ | हैद्राबाद | ०९.४१ |
| डोंबिवली | १०.०३ | महाड | १०.०२ | पंढरपूर | ०९.५४ | वेंगुर्ला | ०९.५७ | लातूर | ०९.४६ | मुधोळ | ०९.५२ | दिल्ली | ०९.५४ |
| अलिबाग | १०.०३ | पुणे | ०९.५९ | मंगळवेढा | ०९.५४ | म्हापसा | ०९.५७ | नागपूर | ०९.४० | विजयपूर | ०९.४९ | बडोदा | १०.०५ |

## राशिभविष्य : जुलै २०२५

**मेष** - घरगृहस्थीची काळजी राहील. साहित्य, लेखनात प्रगती राहील. प्रगतीच्या योजना राबवाल. भावंडांची जबाबदारी घ्याल. विवाह जुळेल. विलंब, त्रास अडचणी अनुभवाल. जवळच्या व्यक्तींना दुखवू नका. कामात यश मिळेल. चंद्रबल- ५, ६, १२, १३, १४, १५

**वृषभ** - महत्त्वाकांक्षी, लहरी बनाल. आर्थिक प्राप्ती जेमतेम पण चांगली राहील. उत्तरार्धात नवीन योजना अमलात आणाल. कामे यशस्वी होतील. पोटाची तक्रार जाणवेल. विवाह जुळेल. कायमस्वरूपी नोकरी मिळेल. भावंडांना त्रास होईल. चंद्रबल- ५, ६, ७, ८, १४, १५

**मिथुन** - परदेशगमन, प्रवास घडतील. आर्थिक प्राप्ती चांगली होईल. सुवर्णालंकारांची प्राप्ती होईल. सामाजिक कार्यातून लाभ होईल. विवाह जुळल्यास सुंदर जोडीदार मिळेल. चटकन राग येईल. उत्तरार्धात आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. चंद्रबल- ७, ८, ९, १०, ११

**कर्क** - धंद्यात स्पर्धा जाणवेल. उत्तरार्धात पित्ताचा त्रास, प्रकृती नरमगरम राहील. कुटुंबात मनमानी कराल. खर्च वाढेल, पण आर्थिक प्राप्ती चांगली राहील. भावंडांना कष्ट पडतील. नवीन कल्पना सुचतील. परदेशगमनाची संधी लाभेल. चंद्रबल- ९, १०, ११, १२, १३

**सिंह** - समाजाभिमुख रहाल. मित्र व नातेवाइकांसाठी खर्च कराल. उत्तरार्धात धंद्यात स्पर्धा जाणवेल. खर्च वाढेल. विद्याव्यासंग वाढेल. विवाह जुळेल. बक्षिसे मिळवाल. भावनावेग आवरा. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. अपघात टाळा. चंद्रबल- ५, ६, १२, १३, १४, १५

**कन्या** - अधिकार असतील पण सुरळीत चालणार नाहीत. वडिलांशी मतभेद असतील. अपेक्षेप्रमाणे प्रॉपर्टीचे सर्व लाभ होतील. भावनिक गुंतागुंत निर्माण होईल. गुणवत्ता वाढवा. आग्रही रहाल. भावंडांकडे दुर्लक्ष करू नका. परदेशगमन घडेल. चंद्रबल- ७, ८, १४, १५

**तूळ** - सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. गुरुकृपा लाभेल. नोकरीत बढतीचे योग येतील. भावंडांना त्रास होईल. फूड पॉयझनिंगचा त्रास संभवतो. महिलांना प्रसूतीसमयी त्रास संभवतो. प्रॉपर्टीची कामे होतील. विवाह जुळेल. परदेशगमन घडेल. चंद्रबल- ५, ६, ९, १०, ११

**वृश्चिक** - शारीरिक व्याधींचा त्रास संभवतो. प्रयत्न तोकडे पडतील. धंद्यात स्पर्धा जाणवेल. उत्तरार्धात आपल्या क्षेत्रात प्रगती होईल. भावनिक कटुता निर्माण होईल. सद्सद्विवेकबुध्दी जागृत होईल. शिक्षणात अडचणी येतील. भावनावेग आवरा. चंद्रबल- ७, ८, १२, १३

**धनू** - अहम्पणा, नाटकीपणा सुखात बाधा आणेल. पुरस्कार मिळतील. विवाह जुळेल. संतती होईल. उत्तरार्धात धंद्यात मंदी जाणवेल. सद्सद्विवेकबुध्दी जागृत ठेवा. विलंब, त्रास, अडचणी अनुभवाल. प्रशिक्षणासाठी निवड होईल. चंद्रबल- ९, १०, ११, १४, १५

**मकर** - विपरीत घटनेतून लाभ संभवतो. कौटुंबिक खर्च वाढेल. नातेवाईक, भावंडे यांचेशी वाद टाळा. आध्यात्मिक प्रगती होईल, पण भावनिक कटुता जाणवेल. लिखाणात चुका होतील. क्रांतिकारक विचार राहतील. शेतीवाडीची कामे होतील. चंद्रबल- ७, ८, ११, १२, १३

**कुंभ** - विवाह जुळेल. शिक्षणापेक्षा इतर छंदांकडे जास्त लक्ष राहील. उत्तरार्धात चांगली संधी लाभेल. भावनिक वातावरण राहील. गाफील राहू नका. विलंब, अडचणी त्रास अनुभवाल. अपघात होणार नाही याची काळजी घ्या. चंद्रबल- ७, ८, ९, १०, ११, १४, १५

**मीन** - विपरीत घटनेतून लाभ संभवतो. संवेदनशील रहाल. सुवर्णालंकारांची प्राप्ती होईल. भावनावेग आवरा. कौटुंबिक खर्च वाढेल. वडिलांची तब्येत सांभाळा. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. चंद्रबल- ९, १०, १२, १३

## पंचांग (मुंबई वेळेप्रमाणे)
### जुलै २०२५ — आषाढ-श्रावण
श्री शालिवाहन शके १९४७ — विक्रम संवत् २०८१

| ता. | वार | तिथी | ता.मि. पर्यंत | नक्षत्र | ता.मि. पर्यंत | योग | ता.मि. पर्यंत | करण | ता.मि. पर्यंत | चंद्रराशी | सूर्योदय | सूर्यास्त | भा.सौर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुलै | | आषाढ | | | | | | | | | | | आषाढ |
| ०१ | मंगळ | शु.षष्ठी | १०.२० | पू.फाल्गुनी | ०८.५३ | व्यतिपात | १७.१७ | गर | २३.०४ | सिंह | ०६.०७ | १९.१८ | १० |
| ०२ | बुध | शु.सप्तमी | ११.५७ | उ.फाल्गुनी | ११.०६ | वरियन | १७.४५ | विष्टि | २४.५९ | १५.२२ नं.कन्या | ०६.०७ | १९.१८ | ११ |
| ०३ | गुरु | शु.अष्टमी | १४.०६ | हस्त | १३.४९ | परिघ | १८.३४ | बालव | २७.१७ | कन्या | ०६.०८ | १९.१८ | १२ |
| ०४ | शुक्र | शु.नवमी | १६.३१ | चित्रा | १६.४९ | शिव | १९.३४ | तैतिल | २९.४५ | २७.१८ नं.तूळ | ०६.०८ | १९.१८ | १३ |
| ०५ | शनि | शु.दशमी | १८.५८ | स्वाती | १९.५० | सिध्द | २०.३४ | वणिज | अहोरात्र | तूळ | ०६.०८ | १९.१८ | १४ |
| ०६ | रवि | शु.एकादशी | २१.१४ | विशाखा | २२.४० | साध्य | २१.२६ | वणिज | ०८.०८ | तूळ | ०६.०९ | १९.१८ | १५ |
| ०७ | सोम | शु.द्वादशी | २३.०९ | अनुराधा | २५.११ | शुभ | २२.०१ | बव | १०.१५ | १५.५९ नं.वृश्चिक | ०६.०९ | १९.१८ | १६ |
| ०८ | मंगळ | शु.त्रयोदशी | २४.३८ | ज्येष्ठा | २७.१४ | शुक्ल | २२.१६ | कौलव | ११.५७ | वृश्चिक | ०६.०९ | १९.१८ | १७ |
| ०९ | बुध | शु.चतुर्दशी | २५.३६ | मूळ | २८.४९ | ब्रह्मा | २२.०८ | गर | १३.११ | २७.१४ नं.धनू | ०६.१० | १९.१८ | १८ |
| १० | गुरु | पौर्णिमा | २६.०६ | पूर्वाषाढा | २९.५५ | ऐंद्र | २१.३७ | विष्टि | १३.५५ | धनू | ०६.१० | १९.१८ | १९ |
| ११ | शुक्र | कृ.प्रतिपदा | २६.०८ | उत्तराषाढा | अहोरात्र | वैधृति | २०.४३ | बालव | १४.१० | धनू | ०६.१० | १९.१८ | २० |
| १२ | शनि | कृ.द्वितीया | २५.४६ | उत्तराषाढा | ०६.३५ | विष्कंभ | १९.३० | तैतिल | १४.०० | १२.०८ नं.मकर | ०६.११ | १९.१८ | २१ |
| १३ | रवि | कृ.तृतीया | २५.०२ | श्रवण | ०६.५२ | प्रीति | १८.०० | वणिज | १३.२७ | मकर | ०६.११ | १९.१८ | २२ |
| १४ | सोम | कृ.चतुर्थी | २३.५९ | धनिष्ठा | ०६.४८ | आयुष्मान | १६.१३ | बव | १२.३३ | १८.५३ नं.कुंभ | ०६.११ | १९.१८ | २३ |
| १५ | मंगळ | कृ.पंचमी | २२.३९ | शततारका | ०६.२५ | सौभाग्य | १४.११ | कौलव | ११.२१ | कुंभ | ०६.१२ | १९.१७ | २४ |
| | | | | पू.भाद्रपदा | २९.४६ | | | | | | | | |
| १६ | बुध | कृ.षष्ठी | २१.०१ | उ.भाद्रपदा | २८.४९ | शोभन | ११.५६ | गर | ०९.५२ | २३.५७ नं.मीन | ०६.१२ | १९.१७ | २५ |
| १७ | गुरु | कृ.सप्तमी | १९.०९ | रेवती | २७.३८ | अतिगंड | ०९.२८ | विष्टि | ०८.०७ | मीन | ०६.१२ | १९.१७ | २६ |
| | | | | | | | | बालव | ३०.०७ | | | | |
| १८ | शुक्र | कृ.अष्टमी | १७.०१ | अश्विनी | २६.१३ | सुकर्मा | ०६.४७ | तैतिल | २७.५३ | २७.३८ नं.मेष | ०६.१३ | १९.१७ | २७ |
| | | | | | | धृति | २७.५५ | | | | | | |
| १९ | शनि | कृ.नवमी | १४.४२ | भरणी | २४.३७ | शूल | २४.५४ | वणिज | २५.२८ | मेष | ०६.१३ | १९.१७ | २८ |
| २० | रवि | कृ.दशमी | १२.१३ | कृत्तिका | २२.५३ | गंड | २१.४७ | बव | २२.५६ | ३०.११ नं.वृषभ | ०६.१४ | १९.१६ | २९ |
| २१ | सोम | कृ.एकादशी | ०९.३९ | रोहिणी | २१.०७ | वृध्दि | १८.३८ | कौलव | २०.२२ | वृषभ | ०६.१४ | १९.१६ | ३० |
| २२ | मंगळ | कृ.द्वादशी | ०७.०५ | मृग | १९.२४ | ध्रुव | १५.३२ | गर | १७.५१ | वृषभ | ०६.१४ | १९.१६ | ३१ |
| | | कृ.त्रयोदशी | २८.३९ | | | | | | | | | | श्रावण |
| २३ | बुध | कृ.चतुर्दशी | २६.२८ | आर्द्रा | १७.५४ | व्याघात | १२.३३ | विष्टि | १५.३२ | ०८.१४ नं.मिथुन | ०६.१५ | १९.१६ | १ |
| २४ | गुरु | अमावास्या | २४.४० | पुनर्वसु | १६.४३ | हर्षण | ०९.५० | चतुष्पाद | १३.३१ | मिथुन | ०६.१५ | १९.१५ | २ |
| | | श्रावण | | | | | | | | | | | |
| २५ | शुक्र | शु.प्रतिपदा | २३.२२ | पुष्य | १६.०० | वज्र | ०७.२७ | किंस्तुघ्न | ११.५७ | १०.५८ नं.कर्क | ०६.१५ | १९.१५ | ३ |
| | | | | | | सिध्दि | २९.३० | | | | | | |
| २६ | शनि | शु.द्वितीया | २२.४१ | आश्लेषा | १५.५१ | व्यतिपात | २८.०५ | बालव | १०.५७ | कर्क | ०६.१६ | १९.१५ | ४ |
| २७ | रवि | शु.तृतीया | २२.४१ | मघा | १६.२२ | वरियन | २७.१२ | तैतिल | १०.३६ | १५.५१ नं.सिंह | ०६.१६ | १९.१४ | ५ |
| २८ | सोम | शु.चतुर्थी | २३.२३ | पू.फाल्गुनी | १७.३४ | परिघ | २६.५३ | वणिज | १०.५७ | सिंह | ०६.१६ | १९.१४ | ६ |
| २९ | मंगळ | शु.पंचमी | २४.४५ | उ.फाल्गुनी | १९.२६ | शिव | २७.०३ | बव | १२.०० | २३.५९ नं.कन्या | ०६.१७ | १९.१३ | ७ |
| ३० | बुध | शु.षष्ठी | २६.४१ | हस्त | २१.५१ | सिध्द | २७.३९ | कौलव | १३.३९ | कन्या | ०६.१७ | १९.१३ | ८ |
| ३१ | गुरु | शु.सप्तमी | २८.५८ | चित्रा | २४.४० | साध्य | २८.३१ | गर | १५.४७ | कन्या | ०६.१७ | १९.१३ | ९ |

दि.१ जुलै रोजी सूर्योदयी : रवि, गुरु-मिथुन, चंद्र, मंगळ-सिंह, बुध-कर्क, शुक्र, हर्षल-वृषभ, शनि, नेपच्यून-मीन, प्लुटो-मकर राशीत राहील. दि.१६ जुलै रवि-कर्क, दि.२६ जुलै शुक्र-मिथुन, दि.२८ जुलै मंगळ-कन्या राशीत प्रवेश करील.

आषाढ पौर्णिमा प्रारंभ- बुधवार दि.९ जुलै उत्तररात्री १.३६, समाप्ती- गुरुवार दि.१० जुलै उत्तररात्री २.०६
आषाढ अमावास्या प्रारंभ- बुधवार दि.२३ जुलै उत्तररात्री २.२८, समाप्ती- गुरुवार दि.२४ जुलै उत्तररात्री १२.४०